अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
नगरसचिव विभाग
मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५

नगरसचिव कार्यालय
दिनांक - २३/ ०३ /२०२३

प्रति,
मा. --------------------------------------
स्थायी समिती, सदस्य

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा क्र.१५ सोमवार दि.२७/०३/२०२३ रोजी सकाळी- ११:३० वाजता महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण प्रत्यक्ष उपस्थीतीने सहभागी व्हावे अशी विनंती आहे.

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

सोमवार दिनांक - २७/०३/२०२३ ची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| १८७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास, वार्षिक देकार व प्रत्येक वर्षी पुढे १० वाढ करुन मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १८८ | अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८६२३९७ प्रभाग क्र.१४ मधील हद्दीतील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/दुरुस्ती करणे सन २०२२-२३ या कामाच्या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| १८९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४६० या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालया पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४९७ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| १९१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे.(पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रान्सपोर्ट पर्यंत) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे व विकासभार निधी सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७७५९२ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भूमापन क्र.७०९ येथील आंगणवाडी केंद्र नगर भुमापन क्र.७१८ मध्ये स्थलांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९३ | अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड (Fylly Cast Iron Burning Stand)-६ नग खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९४ | अहमदनगर महनगरपालिका सन २०२२-२०२३ ई नि क्र. ८५४२९५-१ प्रभाग क्र.४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९५ | अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग ई निविदा क्र.८७८२८८ मनपा हद्दितील प्रभाग क्र.८मध्ये फॅमीली विश्व मोल ते उध्दव ॲकेडमि शाळेपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरणे करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
(एस.बी.तडवी)
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका

सोबत - विषय क्रमांक- १८७ ते १९५ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१८७** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषयः-**अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास, वार्षिक देकार व प्रत्येक वर्षी पुढे १० वाढ करुन मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विषयांकीत बाबत सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे या कामाची ई निविदा क्र. ८६३१२६-१ दि.२८/१२/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. दि.२०/१२/२०२२ रोजी सदर निविदेचा स्क्रीन शॉट पाहिला असता त्याकरिता एकूण ७ निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे. विषयांकित कामांची ई निविदे बाबत तांत्रिक लिफाफा दि.२०/०१/२०२३ रोजी उघडण्यात आला.

ई निविदा क्र. ८६३१२६-१ चा तांत्रिक लिफाफयातील निविदाधारकांची सादर केलेले कागदपत्रे निविदा अटी शर्ती नुसार यथायोग्य असल्यामुळे त्यांचे निविदेचा आर्थिक लिफाफा दि.२३/०२/२०२३ रोजी उघडण्यात आला असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | देय असणारा देकार |
|---|---|---|
| १ | मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी | रू. १,०५,१००/- |
| २ | नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्यूरिटी गार्ड, अहमदनगर | रू. ९५,०००/- (दरवर्षी १०% दरवाढ मागील वर्षाचे भाडे आकारणीवर राहील) |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर यांचे देकार सर्वात जास्तीचा आहे. मात्र सदर एजन्सीने देय असलेल्या देकारात मागील वर्षाचे भाडे आकारणीवर दरवर्षी १०% दरवाढी बाबत त्यांचे दरपत्रकामध्ये नमूद नसल्यामुळे मनपाचा आर्थिक फ़ायदा होणेच्या दृष्टीने दर वाढवून मिळणे कामी जादाचे ठेकेदार एजन्सी मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर यांचेशी वाटाघाटी करणे कामी संबंधिताना त्वरित मा. छाननी समिती समोर बोलविणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रस्ताव मा.उपायुक्त (कर) यांचे समवेत मंजुरीसाठी सादर केला असता त्यांचे समोर मे.कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर चे प्रोपा. श्री.गणेश कुलकर्णी यांनी देकाराच्या अनुषंगाने प्रतिवर्षी १०% दरवाढ देण्याचे पत्रान्वये मान्य केले.

तद्नुसार मा.उपायुक्त (कर) यांनी मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर यांचे वार्षिक देकार रू.१,०५,१००/- व प्रत्येक वर्षापुढे १०% दरवाढ मंजूर करणेस स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर केले नुसार मा.आयुक्त यांनी वरील प्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

परंतू याच दरम्यान एक निविदाकार देवा स्विमींग इन्स्टीटयूट, हरियाणा यांच्या दि.०६/०३/२०२३ रोजीचा ई मेल द्वारे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शहानिशा केली असता देवा स्विमींग इन्स्टीटयूट, हरियाणा हे पात्र ठरत असल्याने त्यांचाही आर्थिक लिफाफा उघडण्यात आला असता त्यांचा देकार रू. ६५,००१/- इतका आलेले आहे.

यास्तव वरील सर्व बाबीचे अवलोकना नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे कामी प्राप्त निविदा दरापैकी मे.कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च ॲकॅडमी अहमदनगर यांचे निविदा दर रू. १,०५,१००/- यांचे देकार रक्कम सर्वात जास्तीची असून निविदा दराचे वाटाघाटीचे वेळी मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर यांनी वार्षिक देकारामध्ये प्रतिवर्षी १०% दरवाढ देण्याचे मान्य केलेले असल्याने सदरचे दरास मंजूरी मिळणे कामी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयासाठी ठेवणे संयुक्तीक राहील.

तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे लिपीक यांचा अहवाल असे.

यावर जल अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, अवलोकनार्थ व 'अ' प्रमाणे मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चाः-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास, वार्षिक देकार व प्रत्येक वर्षी पुढ़े १० वाढ करुन मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- जल अभियंता श्री.निकम साहेब माहिती सांगा.

जल अभियंता श्री.निकम :-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे कामी दोन निविदा प्राप्त झाल्या मनपाचा आर्थिक फ़ायदा होणेच्या दृष्टीने दर वाढवून मिळणे कामी जादाचे ठेकेदार एजन्सी मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी अहमदनगर यांचेशी वाटाघाटी करणे कामी संबंधिताना मा. छाननी समिती समोर बोलविण्यात आले. त्यांनी वार्षिक देकारामध्ये प्रतिवर्षी १०% दरवाढ देण्याचे मान्य केलेले असल्याने सदरचे दरास मंजूरी बाबतचा प्रस्ताव सभेपुढे सादर केलेला आहे.

मा.श्री.शेख मुदस्सरः-अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका, यांना पोहण्याकरीता फि आकरण्यात येवु नये. तसेच याकरीता म.न.पा. अधिकारी व कर्मचारी यांना मा.उपायुक्त (कर) यांची शिफारस बंधनकारक राहिल. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.प्रदिप परदेशीः- :-अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका, यांना पोहण्याकरीता फि आकरण्यात येवु नये. तसेच याकरीता म.न.पा. अधिकारी व कर्मचारी यांना मा.उपायुक्त (कर) यांची शिफारस बंधनकारक राहिल. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेबः-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे कामी प्राप्त निविदा दरापैकी मे.कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च ॲकँडमी अहमदनगर यांचे निविदा दर रू. १,०५,१००/- यांचे देकार रक्कम सर्वात जास्तीची असून निविदा दराचे वाटाघाटीचे वेळी मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकँडमी अहमदनगर यांनी वार्षिक देकारामध्ये प्रतिवर्षी १०% दरवाढ देण्याचे मान्य केलेले असल्याने सदरचे दरास मान्यता देण्यात येत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका, यांना पोहण्याकरीता फि आकरण्यात येवु नये. तसेच म.न.पा. अधिकारी व कर्मचारी यांना जलतरण तलावात पोहण्याकरीता मोफत पास मा.उपायुक्त (कर) यांची शिफारस घेणे बंधनकारक राहिल.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या जलतरण तलाव भाडे तत्वावर ५ वर्षे कालावधीसाठी चालविण्यास देणे कामी ई निविदा क्र. ८६३१२६-१ अन्वये प्राप्त निविदा दरापैकी मे.कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च ॲकँडमी अहमदनगर यांचे निविदा दर रू. १,०५,१००/- यांचे देकार रक्कम सर्वात जास्तीची असून त्यांनी वार्षिक देकारामध्ये प्रतिवर्षी १०% दरवाढ देण्याचे मान्य केलेले असल्याने सदरच्या दरास मान्यता देण्यात येत आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी, मा.नगरसेवक/नगरसेविका, यांना पोहण्याकरीता फि आकरण्यात येवु नये. तसेच म.न.पा. अधिकारी व कर्मचारी यांना जलतरण तलावात पोहण्याकरीता मोफत पास मा.उपायुक्त (कर) यांची शिफारस घेणे बंधनकारक राहिल. ऑफिस रिपोर्ट मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

अनुमोदकः- मा.श्री. प्रदिप परदेशी- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१८८** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८६२३९७ प्रभाग क्र.१४ मधील हद्दीतील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/दुरुस्ती करणे सन २०२२-२३ या कामाच्या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकीय मान्यता- मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची दि.१९/१२/२०२२ रोजीची मंजुरी.
२. ऑनलाईन ई निविदा क्र.- ८६२३९७ / सन २०२२-२३ दि.२६/१२/२०२३
३. निविदा विक्री कालावधी- दि.२६/१२/२०२३ ते दि.१९/०१/२०२३
४. निविदा स्विकारणेचा कालावधी- दि.२६/१२/२०२३ ते दि.१९/०१/२०२३
५. निविदा उघडण्याचा दिनांक- दि.२०/०१/२०२३
६. कामाची मुदत- ४ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल- दि.२०/०२/२०२३ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केलेली आहे. त्यानूसार सदरची निविदा उघडणेस आलेली आहे.

| ई - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर(निविदा दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| सा.बा.वि.ई-निविदा क्र. ८६२३९७ /२०२२-२३ | ई-निविदा क्र.८६२३९७ अ'नगर म.न.पा. हद्दीतील प्र.क्र.१४ मधील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | रु.१.०५.६३.७२०/-/- (GST व्यतिरिक्त) | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर<br>-----------------<br>मे.ए.पी.सोनीमंडलेचा, अहमदनगर | निविदा दराने<br>-----------<br>निविदा दरापेक्षा १५% जादा दराने | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर<br>व<br>अंदाजपत्रकीय<br>दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे,

तरी सदरचे दर वाजवी असून मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांची निविदा दराची/ अंदाजपत्रकीय दराची, निविदा मंजुरीसाठी मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, निविदा दराची निवीदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८६२३९७ प्रभाग क्र.१४ मधील हद्दीतील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/दुरुस्ती करणे सन २०२२-२३ या कामाच्या निविदेच्या मंजुरी बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकरः-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे. तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे. यास्तव सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.संपत बारस्करः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सुनिल त्र्यंबकेः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका ई-निविदा क्र.८६२३९७ प्रभाग क्र.१४ मधील हद्दीतील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/दुरुस्ती करणे सन २०२२-२३ या कामाच्या निविदेच्या निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका प्रभाग क्र.१४ मधील हद्दीतील बुरुडगांव रोडवरील चाणक्य चौक ते साईनगर कमान पर्यंतचा रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे/दुरुस्ती करणे सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८६२३९७ या निविदेचे निविदाधारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कंपनी, अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.श्री. संपत बारस्कर- सही/-

अनुमोदकः- मा.श्री. सुनिल त्र्यंबके- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१८९** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४६० या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुरः-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

संदर्भ :- श्री रोनक दिपक नय्यर, पुणे यांचा दि.10/03/2023 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

1. प्रशासकिय मान्यता :- मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची जा.क्र.सहा.आ/सावियो/प्र.मा./आदेश/2022-23/446 दि. 31/01/2023 ची प्रशासकिय मान्याता.
2. ई-निविदा क्रमांक : 870460 / सन 2022-23 दि. 07/02/2023
3. निविदा विक्री कालावधी : दि. 07/02/2023 ते दि. 21/02/2023
4. निविदा स्विकारणेची दिनांक : दि. 07/02/2023 ते दि. 21/02/2023
5. निविदा उघडणेचा दिनांक : दि. 22/02/2023
6. कामाची मुदत : 6 महिने.
7. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील : दि. 08/03/2023 रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम GST व्यतिरीक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (अंदाजपत्रकिय दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 870460 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र क्र 10 मधील नटराज हॉटेल ते एस. टी. वर्कशॉप पर्यंत रस्त करणे | 41,09,312/- | श्री रोनक दिपक नय्यर, पुणे | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 5% जादा दराने | श्री रोनक दिपक नय्यर, पुणे<br>अंदाजपत्रकिय दरापेक्षा 5% जादा दराने भरलेली आहेत. |
| | | | श्री रासकर विशाल ज्ञानदेव, अहमदनगर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 10% जादा दराने | |

वरील रकाना क्र. 4 मध्ये नमुद निविदाधारक **श्री रोनक दिपक नय्यर, पुणे** यांची सदरची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 05.00% जादा दराने आलेली आहे. परंतु सदर ठेकेदार यांनी उपरोक्त संदर्भांवये दि.10/03/2023 रोजी पत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे.

तरी **श्री रोनक दिपक नय्यर, पुणे** यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर. /'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार अंदाजपत्रकीय दराची निवीदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, 'अ' नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४६० या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब:- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकर:-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे. तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 05.00% जादा दराने आलेली आहे. परंतु सदर ठेकेदार यांनी निविदा दरास काम करण्यास मान्य केलेले आहे. याकरीता सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले) :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४६० या निविदेच्या मंजुरी बाबतचा निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांनी निविदा दराने काम करण्यास सहमतीदर्शविलेली असल्याने निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते एस.टी.वर्कशॉप पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४६० या निविदेच्या मंजुरी बाबतचा निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांनी निविदा दराने काम करण्यास सहमतीदर्शविलेली असल्याने निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले)- सही/-

अनुमोदकः- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१९०** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालया पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४९७ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

1. प्रशासकिय मान्यता :- मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांची जा.क्र.सहा.आ/सावियो/प्र.मा./ आदेश/2022-23/446 दि. 31/01/2023 ची प्रशासकिय मान्याता.
2. ई-निविदा क्रमांक : 870497 / सन 2022-23 दि. 07/02/2023
3. निविदा विक्री कालावधी : दि. 07/02/2023 ते दि. 21/02/2023
4. निविदा स्विकारणेची दिनांक : दि. 07/02/2023 ते दि. 21/02/2023
5. निविदा उघडणेचा दिनांक : दि. 22/02/2023
6. कामाची मुदत : 6 महिने.
7. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील : दि. 08/03/2023 रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम GST व्यतिरीक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (अंदाजपत्रकिय दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 870497 | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र क्र 10 मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालयापर्यंत रस्ता करणे | 40,69,240/- | श्री चेतन मारुती जाधव, अहमदनगर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 10.00% जादा दराने | मे. एच.जी. पठाण कंस्ट्र. कं.,अहमदनगर<br>अंदाजपत्रकिय दराने भरलेली आहेत. |
| | | | मे. एच.जी. पठाण कंस्ट्र. कं.,अहमदनगर | अंदाजपत्रकिय दराने | |

वरील रकाना क्र. 4 मध्ये नमुद निविदाधारक **मे. एच.जी. पठाण कंस्ट्र. कं.,अहमदनगर** यांची सदरची निविदा अंदाजपत्रकिय दराने आलेली आहे. सदरची निविदा सर्वात कमी दराची आहे.

तरी **मे. एच.जी. पठाण कंस्ट्र. कं.,अहमदनगर** यांची सर्वात कमी दराची निविदा दराने आलेली निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार अंदाजपत्रकीय दराची निवीदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, 'अ' नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालया पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४९७ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकरः-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे. तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक मे.एच.जी.पठाण कंस्ट्र. अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे. यास्तव सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले):- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शेख मुदस्सरः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालया पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४९७ या निविदेचे निविदाधारक मे.एच.जी.पठाण कंस्ट्र. अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील तारकपुर बस स्थानक ते राधाबाई काळे महाविद्यालया पर्यंत रस्ता करणे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७०४९७ या निविदेचे निविदाधारक मे.एच.जी.पठाण कंस्ट्र. अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले)- सही/-

अनुमोदकः- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१९१** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे.(पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रान्सपोर्ट पर्यंत) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे व विकासभार निधी सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७७५९२ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

**संदर्भ :-** श्री रोनक दिपक नय्यर, पुणे यांचा दि.10/03/2023 रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

1. प्रशासकिय मान्यता :- मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांची दि. 24/02/2023 रोजीची प्रशासकिय मान्याता.
2. ई-निविदा क्रमांक : 877592 / सन 2022-23 दि. 24/02/2023
3. निविदा विक्री कालावधी : दि. 24/02/2023 ते दि. 03/03/2023
4. निविदा स्विकारणेची दिनांक : दि. 24/02/2023 ते दि. 03/03/2023
5. निविदा उघडणेचा दिनांक : दि. 06/03/2023
6. कामाची मुदत : 6 महिने.
7. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशील : दि. 08/03/2023 रोजीच्या मा.छाननी समितीचे शिफारशीनुसार

| ई-निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम GST व्यतिरीक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर (अंदाजपत्रकिय दरापेक्षा) | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 877592 | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र. 10 मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे (पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रांस्पोर्ट पर्यंत) | रु.50,00,000/- | श्री रोनक दिपक नय्यर, पुणे | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 5% जादा दराने | श्री रोनक दिपक नय्यर, पुणे<br>अंदाजपत्रकिय दरापेक्षा 5% जादा दराने भरलेली आहेत. |
| | | | श्री निकेतन शिवाजी लोटके, अहमदनगर | अंदाजपत्रकिय दरापेक्षा 10% जादा दराने | |

वरील रकाना क्र. 4 मध्ये नमुद निविदाधारक **श्री रोनक दिपक नय्यर, पुणे** यांची सदरची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 05.00% जादा दराने आलेली आहे. परंतु सदर ठेकेदार यांनी उपरोक्त संदर्भांवये दि.10/03/2023 रोजी पत्र देवुन सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस तयार असलेबाबत कळविलेले आहे.

तरी **श्री रोनक दिपक नय्यर, पुणे** यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजूरीस्तव मा.स्थायी समितीकडेस पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केल्यानुसार अंदाजपत्रकीय दराची निवीदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार मान्य.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे.(पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रान्सपोर्ट पर्यंत) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे व विकासभार निधी सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७७५९२ या निविदेच्या मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकरः-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे. तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा 05.00% जादा दराने आलेली आहे. परंतु सदर ठेकेदार यांनी निविदास काम करण्यास मान्य केलेले आहे. याकरीता सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.शेख मुदस्सरः- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले) :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे.(पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रान्सपोर्ट पर्यंत) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे व विकासभार निधी सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७७५९२ या निविदेच्या मंजुरी बाबतचा निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांनी निविदा, निविदा दराने काम करण्यास सहमतीदर्शविलेली असल्याने निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१० मधील नटराज हॉटेल ते हुंडेकरी पार्कींग पर्यंत कॉक्रिटीकरण करणे.(पैकी यशांजली हॉटेल ते हुंडेकरी ट्रान्सपोर्ट पर्यंत) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमीयम रक्कमेतुन कामे करणे व विकासभार निधी सन २०२२-२३ अंतर्गत ई-निविदा क्र.८७७५९२ या निविदेच्या मंजुरी बाबतचा निविदाधारक श्री.रोनक दिपक नय्यर, पुणे यांनी निविदा, निविदा दराने काम करण्यास सहमतीदर्शविलेली असल्याने निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

अनुमोदकः- मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले)- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१९२** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भूमापन क्र.७०९ येथील आंगणवाडी केंद्र नगर भुमापन क्र.७१८ मध्ये स्थलांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

**संदर्भ :-** १) मा. आ. श्री संग्रामभैय्या जगताप यांचे जा.क्र.००२/२/२३ दि. ०३/०१/२०२३ रोजीचे पत्र.

२) इंजि.श्री वैभव फिरादिया यांचे ३८५३/२०२१-२२, दि. ०३/०३/२०२३ रोजीचा स्ट्रक्चरल ऑडिट रिपोट.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये विनंती रिपोर्ट की, संदर्भ क्र. ०१ अन्वये मा. आ. श्री संग्रामभैय्या जगताप यांनी पत्र देऊन अहमदनगर महानगरपालिका हद्दितील मौजे नागापुर येथील नगर भुमापन क्र. ७०९ मध्ये सद्यस्थितीला आंगणवाडी केंद्र सुरु आहे. सदर जागा महाराष्ट्र शासनाच्या मालकीची असुन तलाठी चावडीसाठी महाराष्ट्र शासनाने आरक्षित केली आहे. या जागेवरील तलाठी कार्यालय नादुरुस्त स्थितीत आहे. सदर जागा ही मौजे नागापुर येथील चावडीसाठी आरक्षित असलेने क्षेत्र असुन या जागेच्या जवळच महाराष्ट्र शासनाच्या मालकीची नगर भुमापन क्र. ७१८ ही जागा असुन अहमदनगर महानगरपालिका हद्दितील मौजे नागापुर येथील नगर भुमापन क्र. ७०९ येथुन नगर भुमापन क्र. ७१८ या जागेवर आंगणवाडी केंद्र स्थलांतरीत करण्यात यावे, असे कळविलेले आहे.

त्यानुसार मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्या दि. ०३/०३/२०२३ रोजीच्या मान्यतेने या विभागाकडील जा.क्र.३८५३ दि.०३/०३/२०२३ अन्वये श्री इंजि. श्री वैभव फिरादिया यांना नगर भुमापन क्र. ७१८ मधील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार संदर्भ क्र. ०२ अन्वये त्यांनी इकडेस सादर केलेल्या स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्टमध्ये सदर इमारत जुनी व जिर्ण झालेली असुन मोडकळीस आलेली आहे. तरी सदर इमारत निष्कासीत करणे आवश्यक आहे, असे कळविलेले आहे. सबब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ मधील कलम २६४ अन्वये मोडकळीस असलेली किंवा पडण्याचा संभव असलेली बांधकामे काढुन

टाकण्याच्या तरतुदीनुसार धोकादायक इमारत तात्काळ निष्कासीत करणे आवश्यक आहे.

तरी नगर भुमापन क्र. ७१८ येथे अस्तित्वातील जुनी इमारत निष्कासीत करणेच्या मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस व सदर ठिकाणी सनफ़ार्मा कंपनीस नविन २ रुम आंगणवाडी बांधणेस परवानगी देणेबाबतच्या मान्येतस्तव सविनय सादर./'अ'.

येणे प्रमाणे लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ'नुसार निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भूमापन क्र.७०९ येथील आंगणवाडी केंद्र नगर भुमापन क्र.७१८ मध्ये स्थलांतरीत करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब:- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

मा.शहर अभियंता श्री.निंबाळकर:- अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भुमापन क्र. ७१८ येथे अस्तित्वातील जुनी इमारत निष्कासीत करणे मान्यतेस्तव व सदर ठिकाणी सनफ़ार्मा कंपनीस नविन २ रुम आंगणवाडी बांधणेस परवानगी देणेबाबत मंजुरी मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव समिती पुढे ठेवलेला आहे.

मा.श्री.शेख मुदस्सर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रदिप परदेशी:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भुमापन क्र. ७१८ येथील अस्तित्वातील जुनी इमारत निष्कासीत करण्यास व सदर ठिकाणी सनफ़ार्मा कंपनीस नविन २ रुम आंगणवाडी बांधणेस परवानगी देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

ठरावः-ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.७ मौजे नागापूर येथील नगर भुमापन क्र. ७१८ येथील अस्तित्वातील जुनी इमारत निष्कासीत करण्यास व सदर ठिकाणी सनफ़ार्मा कंपनीस नविन २ रुम आंगणवाडी बांधणेस परवानगी देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचकः- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

अनुमोदकः- मा.श्री. प्रदिप परदेशी- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपलिका

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५

---

**विषय क्रमांक -१९३** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड (Fylly Cast Iron Burning Stand)-६ नग खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महनगरपालिका स्टोअर विभाग.

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओटयावरील शवदहन स्टँण्ड (Fylly Cast Iron Burining Stand) - ६ नग खरेदीकामी दै.नगर टाईम्स दि.१५.०२.२०२३ चे स्थानिक वर्तमानपत्रात,अहमदनगर महानगरपालिका वेबसाईट व अहमदनगर महानगरपालिका नोटीस बोर्डवर नोटीस प्रसिध्द करुन तसेच बाजारात पूरवठादारांशी समक्ष संपर्क साधून कोटेशन दरपत्रके मागवीली असता मुदतीत -

१)निकेतन शिवाजी लोटके,खंडाळा,अहमदनगर
२)चेतन मारुती जाधव,अहमदनगर
३)एच.जी.पठाण,अहमदनगर

याप्रमाणे तीन (३) कोटेशन दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत

सोबत जोडलेला कोटेशन दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र.१ - शवदहन स्टँण्ड (Fylly Cast Iron Burining Stand) चा रक्कम रुपये.१,२१,०००=०० / प्रती १ नग हा दर एच.जी.पठाण,अहमदनगर यांचा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम प्राप्त झालेला आहे.

स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम कोटेशन दर धारक पूरवठादार एच.जी.पठाण,अहमदनगर यांना दर निगोसिएशन करीता बोलावून दि.२८.०२.२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता झालेल्या मा.प्रशासकिय खरेदी समिती बैठकीमध्ये कोटेशन दराच्या तुलनात्मक तक्त्यासह संपूर्ण प्रकरण अवलोकनार्थ तथा दर निगोसिएशनबाबत निर्णयास्तव ठेवले असता दर निगोसिएशन वेळी ते समक्ष उपस्थित होते.दर निगोसिएशनबाबत बैठकीमध्ये सांगोपांग चर्चा होवून त्यांनी कोटेशन दरपत्रकामध्ये दिलेल्या रक्कम

रुपये.१,२१,०००=०० / प्रती १ नग या दरामध्ये रक्कम रुपये.१,०००=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर कमी करुन रक्कम रुपये.१,२०,०००=०० / प्रती १ नग याप्रमाणे दर दिलेला असून तसे लेखी संमतीपत्र सादर केलेले आहे.सदरचा दर खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद केलेला आहे.मुदतीत प्राप्त दरपत्रकातील स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर बाजारभावाशी पडताळून दर निगोसिएशनमध्ये कमी करुन दिलेला अंतिम दर योग्य असल्याने पुरवठादार एच.जी.पठाण,अहमदनगर यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या खालील तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने कॉलम क्र.२ मध्ये नमुद सविस्तर वर्णनाप्रमाणे शवदहन स्टँण्ड (Fylly Cast Iron Burining Stand) - ६ नग त्यांचेकडून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.७,२०,०००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सात लक्ष वीस हजार फक्तच्या)खर्चास मंजुरी देणेबाबत तसेच निविदा मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास शिफारस मा.प्रशासकिय खरेदी समितीमार्फत करण्यात आलेली आहे.

| अ क्र | साहित्याचा तपशिल | परिमाण | कोटेशन दरपत्रकामध्ये नमुद लघुत्तम दर | दर वाटाघाटी नंतर दिलेला अंतिम दर | खरेदीकामी येणारा एकूण खर्च रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | **<u>Fully Cast Iron Burining Stand</u>**<br>**<u>Size -</u>**<br>Length - 6 ft 7 inches<br>Width - 2 ft 10 inches<br>Heights - 3 ft<br>Weight - 500 kg ± kgs | ६ नग | रु.१,२१,०००=०० / प्रती १ नग | रु.१,२०,०००=०० / प्रती १ नग | ७,२०,०००=०० |

तरी मा.प्रशासकिय खरेदी समितीने केलेल्या शिफारशी प्रमाणे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पुरवठादार एच.जी.पठाण,अहमदनगर यांनी दर निगोसिएशन नंतर दिलेल्या उपरोक्त तक्त्यात कॉलम क्र.५ मध्ये नमुद दरास व सदर दराने कॉलम क्र.२

मध्ये नमुद सविस्तर शवदहन स्टँण्ड (Fylly Cast Iron Burining Stand) - ६ नग त्यांचेकडून खरेदी करणेस व खरेदीकामी येणा-या रक्कम रुपये.७,२०,०००=०० फक्त (अक्षरी रक्कम रुपये.सात लक्ष वीस हजार फक्तच्या) खर्चास तसेच निविदा मंजुरीनंतर करण्यात येणा-या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा.स्थायी समिती सभेपुढे माहितीस्तव सादर करण्यास मंजूरी मिळावी हि विनंती.आदेशार्थ सविनय सादर.

**<u>अंदाजपत्रकिय तरतूद - सन.२०२२-२०२३</u>**

सदर नस्तीमध्ये टी- ४ वर नमुद आहे.

येणे प्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर लेखापरिक्षक व मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, स्टोअर विभाग प्रमुख यांनी प्रस्तावित केले प्रमाणे 'अ'नुसार कार्यवाहीस्तव.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चाः-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड (Fylly Cast Iron Burning Stand)-६ नग खरेदीकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- स्टोअर विभाग प्रमुख माहिती सांगा.

स्टोअर विभाग प्रमुख श्री.जाधवः- अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड ६ नग खरेदीकामी तीन (३) कोटेशन दरपत्रके मुदतीत प्राप्त झालेली आहेत. यामध्ये स्पर्धात्मकदृष्टया सर्वात लघुत्तम दर धारक पुरवठादार एच.जी.पठाण,अहमदनगर

त्यांचेकडून खरेदी करण्याचा प्रस्ताव संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहितीकरीता सभेपुढे ठेवलेला आहे.

मा.श्री.संपत बारस्कर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले):- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड (Fylly Cast Iron Burning Stand)-६ नग खरेदीकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकन झाले आहे.

**ठराव:-**ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभागासाठी नालेगाव अमरधाम येथील दहन ओट्यावरील शवदहन स्टॅण्ड (Fylly Cast Iron Burning Stand)-६ नग खरेदीकामी केलेल्या संविदेची महिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये अवलोकन झाले आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक:- मा.श्री.संपत बारस्कर- सही/-

अनुमोदक:- मा.सौ.ज्योती अमोल गाडे (कर्डीले)- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

**विषय क्रमांक -१९४** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय:-** अहमदनगर महनगरपालिका सन २०२२-२०२३ ई.नि.क्र.८५४२९५-१ प्रभाग क्र.४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधमाक विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

१] प्रशासकीय मान्यता :- मा. आयुक्त यांची दि. ०४/११/२०२२ ची मान्यता
२]निविदा क्र.-ई.नि.क्र.८५४२८५ सन २०२२-२३ (म.न.पा.च्या संकेतस्थळावर दि. २५/११/२०२२)
३] निविदा विक्री कालावधी :- दि. २५/११/२०२२ ते १२ /१२ /२०२२
४] निविदा स्विकारण्याची तारीख :- दि. २५/११/२०२२ ते १२ /१२ /२०२२
५] निविदा उघडण्याची तारीख :- दि. १२ /१२ /२०२३
६] कामाची मुदत :- ६ महिने

दिनांक- २३/०२/२०२३ रोजी झालेल्या छाननी समीतीने निविदा अटी शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांचा व्यापारी लिफाफाउघडणेस शिफारस केली आहे. त्यानुसार सदरची निविदा दिनांक ०८ /०३ /२०२३ रोजी उघडण्यात आलेली आहे. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील.

| जाहिर - निविदा क्रमांक | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतिरीक्त (सुधारीत अंदाजपत्रक) | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई नि क्र. ८५४२९५-१ | प्र.क्र. ४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणे. | २५,९३,१८९/- | मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, अ. नगर | अंदाजपत्रकीय दराने | **मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, ,अ.नगर अंदाजपत्रकीय दराने** |
| | | | मे. ए.पी. सोनीमंडलेचा, अहमदनगर | ११.०% जादा दराने | |

वरिल तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक **मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, अहमदनगर** यांची निविदा स्पर्धात्मक दृष्ट्या कमी दराची म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराने** प्राप्त झालेली असून सदरचे दर वाजवी वाटत आहेत.

तरी स्पर्धात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच **अंदाजपत्रकीय दराची मे. बेस्ट कन्स्ट्रक्शन, अहमदनगर** यांची निविदा मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवणेस मा.आयुक्त यांनी दि.२३/०३/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यास सविनय सादर. /'अ'.

येणे प्रमाणे लिपीक व उप अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी./'ब'.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव./'क'.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ''ब' व 'क' मधील अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीसमोर निर्णयार्थ ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महनगरपालिका सन २०२२-२०२३ ई.नि.क्र.८५४२९५-१ प्रभाग क्र.४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेबः- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकरः-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे.

तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे. यास्तव सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.सुनिल त्र्यंबके:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रदिप परदेशी:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महनगरपालिका प्रभाग क्र.४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणे ई.नि.क्र.८५४२९५-१ निविदाधारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव:-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महनगरपालिका प्रभाग क्र.४ मधील मनमाड रोड ते साईदिप हॉस्पीटल रस्ता मजबुती करण व डांबरीकरण करणे ई.नि.क्र.८५४२९५-१ निविदाधारक मे.बेस्ट कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक:- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

अनुमोदक:- मा.श्री.प्रदिप परदेशी- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिति

अहमदनगर महानगरपलिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक : १५**

---

**विषय क्रमांक -१९५** **दिनांक- २७/०३/२०२३**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग ई निविदा क्र.८७८२८८ मनपा हद्दितील प्रभाग क्र.८मध्ये फॅमीली विश्व मोल ते उध्दव ॲकेडमि शाळेपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरणे करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-**अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे,

1. प्रशासकिय मान्यता – मा.आयुक्त यांची.दि. 21/02/2023
2. जाहिर.निविदा क्र. ई.नि.क्र ८७८२८८ सन 2022–2023
3. निविदा विक्री कालावधी – दि.27/02/2023 ते दि.13/03/2023
4. निविदा स्विकारणेचा कालावधी– दि.27/02/2023 ते दि.13/03/2023
5. निविदा उघडण्याचा दिनांक– 14/03/2023
6. कामाची मुदत– 6 महीने
7. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल –दि 16/03/2023 च्या तंत्रिक छाननीनुसार प्राप्त निविदांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| **निविदा क्रमांक** | **कामाचे नाव** | **निविदा रक्कम (GST व्यतिरिक्त)** | **निविदा दाखल करणारे ठेकेदार** | **निविदेमध्ये भरलेला निविदा दर** | **सर्वात कमी दराची निविदा व त्यांचा दर** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| ई.नि.क्र ८७८२८८ | ई.नि.क्र ८७८२८८ अहमदनगर महानगर पालिका हद्दीतील प्र.क्र | 45,09,247/- | **श्री.चेतन मारुती जाधव** ,अ.नगर | निविदा दराने | **श्री.चेतन मारुती जाधव** ,अ.नगर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सन २०२२-२०२३ | 08 मध्ये फमीली विश्व मॉल ते उध्दव अकडमी शाळेपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. (नगर कल्याणरोड ते उध्दव अकडमी शाळेपर्यंत ) | | मे यश कन्स्ट्रक्शन **& सप्लायर्स** अ.नगर | निविदा दरापेक्षा 2% ज्यादा दराने | निविदा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या रकाना क्र.5 मध्ये नमुद निविदाधारक **श्री.चेतन मारुती जाधव**,अ.नगर यांची निविदा **निविदा दराने** आलेली असुन ती सर्वात कमी दराची आहे.

तरी उक्त बाब विचारात घेवुन निविदाधारक **श्री.चेतन मारुती जाधव**,अ.नगर यांची निविदा **निविदा दराने** असल्याने मा.आयुक्त यांनी सदरची निविदा मा.स्थायी समीतीपुढे मंजुरीस्तव ठेवणेस मान्यता दिलेली आहे त्यानुसार सदरची निविदा मान्यतेस्तव सविनय सादर/'अ'.

येणे प्रमाणे उप अभियंता तथा शहर अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ मधील कलम ७३-क नुसार विभागाने कार्यवाही करावी. विभागाने प्रास्तावित केलेप्रमाणे 'अ' नुसार मान्यतेस्तव.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित 'अ' नुसार अंदाजपत्रकीय दराची निविदा निर्णयास्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

**चर्चा:-**

मा.सभापती साहेब:- अहमदनगर महनगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग ई निविदा क्र.८७८२८८ मनपा हद्दितील प्रभाग क्र.८मध्ये फॅमीली विश्व मोल ते उध्दव ॲकेडमि शाळेपर्यंत रस्ता कॉक्रीटीकरणे करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.विनीत पाउुलबुधे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब:- शहर अभियंता श्री.निंबाळकर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.निंबाळकर:-सदर निविदेमध्ये दोन निविदा प्राप्त झालेल्या असुन तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या दरांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. तांत्रिक छाननी समितीने शिफारस केल्यानुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले आहे. तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्ट्या निविदाधारक श्री.चेतन मारुती जाधव,अहमदनगर यांची निविदा, निविदा दराने आलेली असुन सर्वात कमी दराची आहे. यास्तव सदरचा प्रस्ताव सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात आलेला आहे.

मा.श्री.शेख मुदस्सर:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रदिप परदेशी:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महनगरपालिका मनपा हद्दितील प्रभाग क्र.८ मध्ये फॅमीली विश्व मोल ते उध्दव ॲकेडमि शाळेपर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरणे ई निविदा क्र.८७८२८८ या निविदेचे निविदाधारक श्री.चेतन मारुती जाधव, अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव:-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महनगरपालिका मनपा हद्दितील प्रभाग क्र.८ मध्ये फॅमीली विश्व मोल ते उध्दव ॲकेडमि शाळेपर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरणे ई निविदा क्र.८७८२८८ या निविदेचे निविदाधारक श्री.चेतन मारुती जाधव, अहमदनगर यांच्या निविदा दराच्या निविदेस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर.खर्च मंजुर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक:- मा.श्री.शेख मुदस्सर- सही/-

अनुमोदक:- मा.श्री. प्रदिप परदेशी- सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपलिका